**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ७२/२००९**
**७३/२००९**
**७४/२००९**
**व ७५/२००९**

जा.क्र. दि.

अर्जदार तथा अपिलकर्ता
कु.भाग्यश्री अरविंदराव देशपांडे
अधिव्याखाता, डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय
अमरावती

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहसंचालक, उच्च शिक्षण
अमरावती विभाग, अमरावती

२. जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य, डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय
मोर्शी रोड, अमरावती

(आदेश पारीत दिनांक ०४/०१/२०१०)

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे श्री व्ही.डी.देशपांडे, प्रशासन अधिकारी हजर आहेत व त्यांनी खुलासा सादर केला आहे. जन माहिती अधिकारी तर्फे श्री पी.वाय.दाभाडे, प्राध्यापक हजर आहेत व त्यांनी खुलासा सादर केला आहे.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रपत्र अ प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, मोर्शी रोड, अमरावती यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली होती ती बरीचशी प्रश्नोत्तर स्वरुपात असल्यामुळे अर्जदाराला माहिती अधिकारी यांचेकडुन ती देण्यात आली नाही परंतु सुनावणी दरम्यान माहिती अधिकारी यांनी कबुल केले की, त्यांनी अर्जदाराविरुध्द जो अहवाल संस्थेच्या सचिव यांना पाठविला त्यासंबंधी सर्व कागदपत्र अर्जदाराला दिले आहेत. त्याशिवाय हया प्रकरणासंबंधी त्यांचेजवळ किंवा त्यांचेकडील नस्तीमध्ये काहीही नसल्याचे ते लिहुन देण्यास तयार आहेत.

. . . .२

तसेच अर्जदाराला दि.२५/७/०८ च्या अर्जामध्ये नमुद केल्यानुसार तासीकेचे (period) चे एकुण ८ वेळापत्रकांच्या साक्षांकित प्रती पाहीजे आहेत त्या जन माहिती अधिकारी यांनी २ रु. प्रतीप्रमाणे पैसे घेवून आज पासुन ८ दिवसाचे आत अर्जदारास देण्याचे कबुल केले त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या सर्व अर्जांच्या अनुषंगाने अर्जदाराला आज पासुन ८ दिवसाचे आत संपुर्ण रेकॅार्डचे निरीक्षण देवून अर्जदाराला पाहीजे असलेल्या कागदपत्रांच्या झेरॅाक्स प्रती अर्जदाराला द्याव्यात. जी माहिती उपलब्ध नसेल त्यासंबंधी अर्जदाराला तसे लेखी द्यावे. डॅा.वर्षा देशमुख, प्राध्यापक विधी महाविद्यालय अमरावती यांनी अर्जदाराविरुध्द जी तक्रार दि. ५/७/०७ रोजी प्राचार्य डॅा.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, मोर्शी रोड, अमरावती यांचेकडे दाखल केली त्यासोबत सादर केलेले पुराव्यांच्या साक्षांकित प्रती तसेच डॅा.वर्षा देशमुख यांनी चौकशी दरम्यान प्राचार्य यांचेकडे सादर केलेल्या लेखी बयाणासोबत (क्र.६०७/२००७ दि.६/८/२००७) त्यांनी सादर केलेल्या पुराव्यांबाबत दस्तऐवजांच्या साक्षांकित झेंरॅाक्स प्रती अर्जदाराला पाहीजे आहेत त्या देण्यात याव्या. असे पुरावे देण्यात आले नसतील तर अर्जदाराला तसे लेखी द्यावे.

अर्जदाराला वरीलप्रमाणे माहिती न मिळाल्यास अर्जदाराने या आयोगाकडे कलम १८ अन्वये तक्रार करावी.

**वरीलप्रमाणे आदेश देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

जिसकार/